सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## केंद्रीय अर्थमंत्र्यांकडून चालू वर्षाचा आर्थिक विकास दर जाहीर; संसदेत पाहणी अहवाल सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नवी दिल्ली**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शुक्रवारी (३१ जानेवारी) लोकसभेत आर्थिक वर्ष २०२४-२५ चा आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. या अहवालाद्वारे चालू आर्थिक वर्षातील अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचं मूल्यांकन केलं जातं. तसेच देशासमोरील आर्थिक आव्हानांची रूपरेषा संसदेत मांडली जाते. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अर्थव्यवस्थेच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी सरकारकडून वार्षिक दस्तऐवज सादर केले जातात, त्यालाच आर्थिक पाहणी अहवाल असं म्हटलं जातं. यंदा सादर केलेल्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर हा ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.




आर्थिक पाहणी अहवाल मुख्य आर्थिक सल्लागारांच्या देखरेखीखाली तयार केला जातो. १९५०-५१ मध्ये सर्वात पहिल्यांदा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला होता. तेव्हा हा अहवाल अर्थसंकल्पाबरोबरच सादर करण्यात आला होता. पुढील १० वर्षे तीच पद्धत अवलंबली जात होती. मात्र, १९६० मध्ये यात बदल करण्यात आला. १९६० पासून आर्थिक पाहणी अहवाल अर्थसंकल्प सादर करण्याच्या आदल्या दिवशी मांडण्याची प्रथा सुरू झाली. उद्या म्हणजेच १ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचा अर्थसंकल्प सादर करतील.

आर्थिक पाहणी अहवाल सादर करताना देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन म्हणाले, देशांतर्गत अर्थव्यवस्थेची पायाभूत तत्त्वे मजबूत आहेत, विदेशी व्यापारातील समतोल, सुनियोजित वित्तीय एकत्रीकरण आणि खासगी क्षेत्रातील स्थिर मागणीचा विचार करता आर्थिक वर्ष २०२६ मध्ये विकासदर ६.३ ते ६.८ टक्क्यांच्या दरम्यान राहील. सर्वेक्षणाच्या कागदपत्रानुसार, सर्व क्षेत्रांमध्ये चांगली कामगिरी दिसेल.

**अन्नधान्यमहागाई वाढण्याची शक्यता**

हवामानातील बदलांमुळे अन्नधान्याच्या महागाईत वाढ होऊ शकते, विशेषत: शेतीवर अवलंबून असलेल्या उत्पादनांवर परिणाम दिसून येईल. अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात राहाव्यात यासाठी सरकारनं यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध पावलं उचलली आहेत.


**अधिक स्पर्धात्मक होण्याची गरज**

भारतीय अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर अधिक स्पर्धात्मक असणं गरजेचं आहे, असंही या सर्वेक्षणात म्हटलं आहे. भारताला आपली व्यावसायिक धोरणं आणि गुंतवणुकीत आणखी सुधारणा करावी लागेल जेणेकरून आपण जागतिक बाजारपेठेत आपले अस्तित्व अधिक मजबूत करू शकू.

## बिचाऱ्या महिलेला बोलताही येईना! राष्ट्रपती मुर्मू यांच्या अभिभाषणावर सोनिया गांधींची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नवी दिल्ली**

संसदेच्या बजेट सत्राला सुरुवात झालीय पहिल्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिषणाणावरून काँग्रेस नेत्या सोनिया गांधींनी टीका केलीय. कृषी क्षेत्रात आधुनिककरण आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने सरकार करत असलेल्या योजनांची माहिती दिली. शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवले असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या अभिषणाणात सांगितलं. त्याविधानावरून विरोधकांनी राष्ट्रपतींवर टीका केलीय.



संसदेत बजेट सत्राच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरून काँग्रेस नेत्या सोनिया गांधींनी प्रतिक्रिया दिलीय. राष्ट्रपती अखेरपर्यंत बोलताना खूप थकलेल्या जाणवत होत्या. बोलताना शेवटी त्यांना बोलता येत नव्हतं, असं म्हणतात त्यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना बिचारी महिला संबोधलंय. तर राहुल गांधींनीही राष्ट्रपतीच्या अभिभाषणावर टीका केलीय. राष्ट्रपतींचं अभिभाषण हे बोरिंग होतं, असं म्हटलंय. त्यांचे अभिभाषण हे खूप कंटाळवाणी होतं त्यात, काही नवं नव्हतं.असे ही सोनिया गांधी म्हणाल्यात.

## ...तर आरएसएस कधीच सत्तेत आली नसती; ९० च्या दशकातील चुकांवर बोट, राहुल गांधींचा काँग्रेसला डोस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नवी दिल्ली**

इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळाचा उल्लेख करत राहुल गांधी यांनी काँग्रेसकडून झालेल्या चुकांवर आणि उणिवांवर बोट ठेवले. काँग्रेसच्या धोरणात चूक झाल्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सत्तेत आला. जर पुन्हा मूळ जनाधार काँग्रेससोबत आला तर भाजप आणि आरएसएसला जावं लागेल आणि असे लवकरच होईल, असे भाष्य विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी केले.

३० जानेवारी रोजी दलित इन्फ्लुअन्सरच्या वतीने एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दलित, अल्पसंख्याक आणि मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या समूहांच्या विकासाबद्दल भाष्य केले. या समुदायांना केवळ राजकीय प्रतिनिधित्व मिळाल्याने समस्या संपणार नाहीत, तर जोपर्यंत त्यांना संस्था आणि संपत्तीमध्ये भागीदारी मिळत नाही, समस्या संपणार नाहीत, असे ते म्हणाले.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळाचे स्मरण करत राहुल गांधी म्हणाले, तेव्हा काँग्रेसला दलित, अल्पसंख्याक आणि भटक्या विमुक्तांचा पूर्ण पाठिंबा होता. पण, १९९० च्या दशकात काही चुका, उणीवा राहिल्या आणि हे सत्य पक्षापासून लपलेले नाही.

मागील १०-१५ वर्षात काँग्रेस पक्षाने ते केले नाही, जे त्याने करायला पाहिजे होते (दलित, अल्पसंख्याक, भटक्या




विमुक्तांसाठी). जर मी असे बोललो नाही, तर मग माझं बोलणं खोटं असेल. जर काँग्रेसने दलित, भटक्या विमुक्तांना साथ दिली असती, त्यांचा विश्वास टिकवून ठेवला असता, तर आरएसएस कधीच सत्तेत आली नसती, असे राहुल गांधी म्हणाले.

इंदिरा गांधी यांच्या काळात दलित, अल्पसंख्याक, भटक्या विमुक्तांचा काँग्रेसवर पूर्ण विश्वास होता. पण, १९९० नंतर त्यात उणीवा निर्माण झाल्या. हे सत्य काँग्रेसला स्वीकारावंच लागेल, असेही राहुल गांधी यांनी सांगितले.तुम्ही गेल्या काही महिन्यांपासून बघत असाल. भाजप काँग्रेसला काहीही करू शकत नाही. ते देश चालवू शकत नाही. ते धोकेबाज आहेत, अशी टीका राहुल गांधींनी भाजपवर केली.

जोपर्यंत दलित, मागास, भटक्या विमुक्तांना सत्तेत त्यांचा हिस्सा मिळत नाही, तोपर्यंत समस्या सुटणार नाहीत. शिक्षण व्यवस्थेत त्यांना भागीदारी मिळाली, पण नियंत्रण मिळालं नाही. सध्या शून्य आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**...तर भाजप आणि आरएसएस सत्तेतून पायउतार होईल**

याच कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले, ज्या दिवशी आपली एकजूट होईल, ते (भाजप-आरएसएस) सत्ता सोडून जातील. ज्यादिवशी काँग्रेसचा मूळ जनाधार एकत्र येईल, त्या दिवशी भाजप-आरएसएस पळून जाईल. आपल्याला आपल्या एकजुटीवर काम करावं लागेल. आपल्याला दलित, अति मागास, अल्पसंख्याकांचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल आणि त्यांना पुढे घेऊन जावे लागेल. असे करण्यासाठी काही वर्षे लागतील, असे राहुल गांधी म्हणाले.

## मुख्यमंत्री दर आठवड्यात घेणार भाजप मंत्र्यांचा क्लास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूत्र हाती घेतल्यापासून झपाट्याने काम सुरु केले आहे. पक्षातील मंत्र्यांनी त्यांनी कामाला लावले आहे. त्यांनी आता दर आठवड्याला मंत्र्यांच्या कामाचा आढावा घेण्यास सुरुवात केली. आता शुक्रवारी त्यांनी मंत्र्याचा क्लास घेतला अन् आठवड्याचे वेळापत्रक ठरले. तसेच भाजप मंत्र्यांचे दर १५ दिवसांनी रिपोर्ट कार्ड तयार करण्यात येणार आहे.

**असे असणार मंत्र्याचं कामकाजाच वेळापत्रक**

भाजप मंत्री सोमवार ते बुधवार मुंबईमध्ये असणार.

मंत्री गुरूवारी आणि शुक्रवारी राज्यभरात विभागाच्या कामाचा आढावा घेतील.

मंत्री शनिवारी आणि रविवारी आपल्या मतदार संघातील प्रश्न मार्गी लावणार.

कॅबिनेट बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मंत्र्याना यासंदर्भात आदेश देखील दिले आहेत. प्रत्येक विभागात सुरू असणाऱ्या सुनावण्या प्रलंबित न ठेवता पूर्ण करा. त्यासाठी विशेष वेळ द्या, असे त्यांनी म्हटले. त्यामुळे येणाऱ्या काळात मंत्र्याना आधिक वेळ काम करून सुनावण्या पूर्ण कराव्या लागणार आहेत.

**सरकार आणि संघटना यांच्यात समन्वय**

सरकार मार्फत कामे करताना भाजपची संघटना मजबुतीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष आणि मंत्र्यांची दर पंधरवड्याला आढावा बैठक होणार आहे. मंत्र्यांनी संघटनेमार्फत आलेली किती लोकोपयोगी कामे मार्गी लावली? त्याचा आढावा घेणार आहे. मुख्यमंत्र्यांसोबत दर तीन महिन्यांनी भाजप मंत्री व पदाधिकार्यांची बैठक होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण त्यात आढावा घेणार आहे.

## धनंजय मुंडेंचे अंतर्मनातून वक्तव्य : दोष सिद्धच झाला नाही बावनकुळे यांच्याकडूनही पाठराखण; तर राज ठाकरेंनाही प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

राज्य म्हणून विचार केल्यास महायुतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढल्या पाहिजे, अशा स्पष्ट सूचना आम्ही राज्य म्हणून दिलेल्या आहेत. मात्र, स्थानिक पातळीवर स्थानिक पदाधिकाऱ्यांनी काही निर्णय घेतला तर त्याबद्दल आम्ही एकत्र येऊन विचार करून निर्णय घेणार असल्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या शक्यतो महायुती म्हणूनच लढणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी स्पष्ट केले. अजित पवार, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी मिळून याबाबतचा निर्णय घेतला असल्याचे देखील बावनकुळे यांनी सांगितले आहे.



अमरावती शहराचे पालकमंत्री पद मिळाल्यानंतर चंद्रशेखर बावनकुळे यांनी पहिल्यांदाच अमरावती जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी अमरावती जिल्ह्यातील विविध प्रश्नांचा आढावा घेतला. अमरावती शहराच्या विकासासाठी सर्वत्र प्रयत्न करणार असल्याचा दावा यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. अमरावती जिल्ह्याला जास्तीत जास्त निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. अमरावती शहरातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी महायुतीचे सरकार म्हणून आपण प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. अमरावती जिल्ह्यातील सर्व आमदारांच्या, महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

**धनंजय मुंडे अंतर्मनातून बोलत आहेत**

धनंजय मुंडे यांनी स्वतः देखील हे मान्य केले आहे की, माझा एक टक्का जरी दोष असेल तर मी पक्ष सांगेल ते करायला तयार आहे. मात्र माझा दोष दाखवा, असे त्यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केला जात आहे. त्यांना टार्गेट केले जात आहे, राजीनाम्याची मागणी केली जात आहे. ते भावनात्मक पद्धतीने अंतर्मनातून बोलत आहेत. मात्र या प्रकरणात जोपर्यंत तपास पूर्ण होत नाही. तपासामध्ये तीन ते चार यंत्रणा काम करत आहेत. त्या तपासामधून काही भेटले तर त्याबाबतचा निर्णय होईल. मात्र, धनंजय मुंडे यांचा दोष आहे का? हे आधी सिद्ध करावे लागेल, असे देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. एखाद्या व्यक्तीशी संपर्कात असणे हा दोष नाही. वाल्मीक कराड यांचा परिचय असणे हा काही गुन्हा नाही. सोबत राहणाऱ्या एका कार्यकर्त्याने एखादी घटना केली असेल तर त्यात माझा दोष नसतो, असा दावा देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

## प्रयागराजमध्ये अमरावतीच्या भाविकांचे हाल, आयोजकांविरोधात प्रचंड रोष

### आमदार रवी राणा यांनी सुरज मिश्रा सारख्या कार्यकर्त्यांना सोबत ठेवू नये भाविकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

महाकुंभ मेळाव्यानिमित्त प्रयागराज येथे मौनी अमावस्येच्या पर्वावर स्नानासाठी अमरावतीतून प्रयागराजला गेलेल्या भाविकांचे प्रचंड हाल झाल्याचं बघायला मिळालं. तसंच ज्यांनी या यात्रेचं आयोजन केलं त्यांनी भाविकांना वाऱ्यावर सोडून पळ काढल्याचा आरोप केला जात आहे.

अमरावती शहरातून २७ डिसेंबर रोजी एकूण ६०० जण प्रयागराजला निघाले. सुरज मिश्रा नावाच्या व्यक्तीनं स्लीपर बससाठी १५ हजार आणि आसन व्यवस्था असणाऱ्या बससाठी प्रत्येकी सहा हजार रुपये घेऊन भाविकांना प्रयागराज, हरिद्वार आणि अयोध्या येथे यात्रेसाठी नेलं. या प्रवासादरम्यान प्रत्येकाला चहा, नाश्ता, जेवण मिळेल आणि राहण्याची देखील सगळी व्यवस्था उपलब्ध असल्याचं सांगण्यात आलं. मात्र, वास्तवात प्रवाशांना चहा आणि जेवण दोन्ही पुरवण्यात आलं नाही. वृद्ध आणि मधुमेहाच्या रुग्णांना यामुळं प्रचंड त्रास सहन करावा लागला. या संदर्भात अनेकांनी प्रचंड रोष व्यक्त केलाय. विशेष म्हणजे या यात्रेसाठी संपूर्ण पैसे भरले असताना देखील सर्व यात्रेकरूंना स्वतःच्या खाण्यापिण्याची व्यवस्था स्वतःच करावी लागली, असं देखील सांगितलं जात आहे.

**राहण्याची व्यवस्था नाही**

प्रयागराज येथे पोहोचल्यावर राहण्याची उत्तम व्यवस्था आहे, असं सांगण्यात आलं होतं. मात्र, या ठिकाणी अतिशय अडचणींचा सामना करत पोहोचल्यावर वीस बाय



वीसच्या टेन्टमध्ये ५०० जणांना ठेवण्यात आलं. तसंच बाजूला भंडारा सुरू असून तिथं जेवण करायला सांगितलं. त्याठिकाणी अक्षरशः गवतावर झोपावं लागलं आणि आज पहाटे चार वाजताच तिथल्या साध्वीनं हाकलून लावल्याचं दुःख देखील भाविकांनी व्यक्त केलं.

**३६ तासांचा प्रवास**

अमरावतीवरुन प्रयागराजच्या दिशेनं निघाल्यावर प्रत्येक टोल नाक्यावर दोन अडीच तासापर्यंत थांबावं लागलं. आयोजकांनी टोल देखील भरला नाही. एका ठिकाणी सर्वांना गाडीतून उतरवल्यावर तिथून ५० किलोमीटर पायपीट करत आम्ही प्रयागराजला पोहोचलो. ज्यांना पायी चालण्याचा त्रास आहे, त्यांना आता प्रचंड वेदना झाल्या. आमची आर्थिक लूट तर झालीच त्यासोबतच प्रचंड मनस्ताप झाल्याचा आरोप देखील भाविकांनी केलाय.

**आमदार रवी राणा यांच्याकडं तक्रार**

या यात्रेचं आयोजन करणारा सुरज मिश्रा हा आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचा कार्यकर्ता आहे. त्याच्या ढिसाळ नियोजनासंदर्भात आमदार रवी राणा यांच्याकडं तक्रार करण्यात आली आहे. आमदार राणांनी त्याची कानउघडणी करणार असं सांगितलं. मात्र, गत तीन दिवसांपासून सुरज मिश्राचा फोनच बंद आहे. त्यामुळे त्याची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. तर आमदार रवी राणा यांनी सुरज मिश्रा सारख्या कार्यकर्त्यांना सोबत ठेवू नये, अशी मागणी भाविकांनी केलीय.

**पालकमंत्र्यांची सारवासारव**

या प्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना यासंदर्भात विचारणा केली असता, त्यांनी या यात्रेकरुंना सर्वतोपरि मदत दिली जात असल्याचं त्यांनी आमच्या प्रतिनिधीला सांगितलं. तसंच आ. रवी राणा यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनीही या भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात येत असल्याचं सांगितलं.

## संपादकीय ......

# भाविकहो, जरा जपून..!

*प्रयागराजमध्ये सध्या सुरू असलेल्या कुंभमेळ्याची धूम अवघ्या भारतभर पाहण्यात येत आहे. सात दिवसांत आठ कोटी लोकांनी स्नान केल्याचा विक्रम या कुंभमेळ्याच्या नावावर आहे. हा कुंभमेळा सुरू असताना तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य नागरिकांना एकच काळजी होती आणि ती म्हणजे दुर्घटना घडण्याची. आजवर सुरळीत चाललेल्या कुंभमेळ्यामध्ये नेमकी दुर्घटना घडली आणि चेंगराचेंगरीत१५ लोक मृत्यू पावले आणि अंदाजे ५० लोक जखमी झाले आहेत. अभूतपूर्व गर्दीचा हा कुंभमेळा देशाच्या नव्हे, तर जगाच्या आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. अशावेळी गर्दी होणारच आणि काहीतरी दुर्घटना घडणार अशी काळजी सतत वाटत होती आणि घडलेही तसेच.महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून अक्षरशः हजारो लक्झरी बसेसमधून भाविक कुंभमेळ्यामध्ये स्नान करण्यासाठी जात आहेत. ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करणार्या लोकांना यामुळे सुगीचे दिवस आले आहेत, हे निश्चित! झोपून जाण्याचे स्लीपर कोच तुमच्या गावावरून निघून उज्जैन, पुढे प्रयागराज आणि त्यापुढे वाराणसी तसेच राम जन्मभूमी हे सर्व करत करत येताना शेगाव करणे असा काहीसा दिनक्रम या भाविकांचा आहे. ज्यांना फक्त कुंभमेळ्याची पर्वणी साधून गंगेत डुबकी मारायची आहे त्यांच्यासाठी मात्र तीन दिवसांचे पॅकेज उपलब्ध आहे. साधारणत: २२ तासांचा प्रवास, त्यानंतर गंगेमध्ये डुबकी मारणे आणि संध्याकाळी परतीचा प्रवासाला लागणे असे जेमतेम ७२ तासांमध्ये कुंभमेळा स्नान करून देण्याची योजना अनेक व्यावसायिक मंडळींनी आखली आणि त्याप्रमाणे ती अंमलात पण आणली आहे.*

*आमचे म्हणणे एवढेच आहे की, नियोजन जरूर करा; परंतु गर्दी कधी होईल, हे लक्षात ठेवूनच नियोजन करा. परवाची घडलेली दुर्घटना ही मौनी अमावस्येच्या दिवशी घडलेली आहे. कारण, या दिवशी स्नान करण्यासाठी सर्वात जास्त गर्दी झाली होती. काटेकोर नियोजन केल्याबद्दल उत्तर प्रदेश सरकारचे अभिनंदन; परंतु कितीही व्यवस्था केली, तरी ती कमीच पडते असे आपल्या देशात नेहमी दिसून येते. आज गर्दीची अशी परिस्थिती आहे की, भाविकांनो, थांबा येऊ नका, असे म्हणण्याची वेळ आली आहे. अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी स्थळाच्या प्रमुखांनी कृपा करून इकडे येऊ नका, अशी कळकळीची विनंती केली आहे. आज कुंभमेळ्याच्या ठिकाणी गाड्या लावण्यासाठी जागा नसल्यामुळे त्या गाड्यांना पुढे रायबरेलीमध्ये पार्किंग दिले जात आहे. एखाद्या शहराची किती लोकांना सामावून घेण्याची क्षमता आहे, हे पाहिले तर एक कोटी लोकांना कोणतेही भारतातील शहर सामावून घेऊ शकत नाही, हे आपल्या लक्षात येईल.कुठेही गर्दी होत असेल, तर सर्वात महत्त्वाचे काय असेल, तर ती सुरक्षा असते. आपल्या मनामध्ये कुंभस्नान करण्याची तीव्र आकांक्षा असणे चुकीचे नाही; पण त्यासाठी सुरक्षिततेमध्ये तडजोड होता कामा नये. अतिरिक्त गर्दी झाली की, चेंगराचेंगरी होते आणि निष्पाप लोक विनाकारण दगावतात हे आपल्या नेहमी पाहण्यात येते. सर्व भाविकांना आमची नम्र विनंती आहे की, जरूर नियोजन करा; परंतु एकाच वेळेला त्या ठिकाणी गर्दी झाली, तर असे अपघात निश्चित घडून येऊ शकतात, याची जाणीव जरूर ठेवा.उत्तर प्रदेशात सध्या खूप थंडी आहे. या थंडीच्या कडाक्यात थंड पाण्याने स्नान केल्यामुळे आरोग्याचे प्रश्न उभे राहत आहेत. हृदयविकाराच्या झटक्याने होणार्या मृत्यूंची संख्याही तिथे भरपूर आहे.*

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान, कुष्ठरुग्ण शोध मोहिमेचे उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरूवार, दि. ३० जानेवारी विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयात कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्यात आला. यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान आणि कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीमेला सुरवात करण्यात आली.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड यांनी क्षयरोगाविषयी माहिती दिली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी विद्यार्थ्यांनी रुग्ण तपासणीमध्ये प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन करून अभियान आणि मोहिमेचे उद्घाटन केले. प्राचार्या प्रीती पवार यांनी पपेट शोतून कुष्ठरोगाविषयी जनजागृती केली. प्राचार्य डॉ. संजय चोपकर यांनी विद्यार्थी अभियानात सक्रिय सहभाग घेतील, असे सांगितले. संचालक डॉ. रवींद्र वाघमारे यांनी कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन केले.

सुरवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात आले.

कुष्ठरोग आरोग्य सेवा सहाय्यक संचालक डॉ. पूनम मोहोकार यांनी प्रास्ताविक केले. अवैद्यकीय पर्यवेक्षक गजानन पन्हाळे व डॉ. श्रद्धा यादगिरे यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमासाठी अवैद्यकीय पर्यवेक्षक दीपक गडलिंग, कुष्ठरोग तंत्रज्ञ रितेश ठाकरे, श्री. कदम, पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथकाचे डॉ. विनंती नवरे, अवैद्यकीय सहाय्यक रमेश सोनार, जोसेफ पीटर, अविनाश इंगळे, अतुल धुळे, सीमा केने, मंजुषा गावंडे, कविता दहिवले, शहरी आरोग्य केंद्र येथील डॉ. कृष्णकांत पाथरे यांनी पुढाकार घेतला.

# कुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांसाठी संपर्क क्रमांक जाहिर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती,**

कुंभमेळ्यासाठी प्रयागराज येथे जाणाऱ्या नागरीकांनी दक्षता घ्यावी. तसेच आवश्यक भासल्यास नियंत्रण कक्षाच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे कुंभमेळा २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविक भक्त दर्शनासाठी जात आहेत. आपात्कालीन स्थितीत प्रयागराज येथील कंट्रोल रुम दुरध्वनी क्रमांक ०५२२-२२३७५१५ आहे. तसेच मंत्रालय नियंत्रण कक्ष, मुंबई क्रमांक ०२२-२२०२७९९० तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२०२५ आहे. प्रयागराज येथे दर्शनासाठी गेलेल्या नागरीकांनी आवश्यकता भासल्यास सदर क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



# हरभरा व गहू पिकाचे उत्पादन होईल दुप्पट

## विसरू नका 'या' फायद्याच्या बाबी







**दि.३१ विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात सध्या सर्वत्र हरभरा व गव्हाचे पीक जोमदार वाढीच्या, फुलोरा किंवा पक्वतेच्या अवस्थेत आहे.

या अवस्थांमध्ये पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण व खताची फवारणी याकडे लक्ष दिले तर चांगले उत्पादन मिळविणे शक्य होते.

हरभरा पिकाच्या उत्पादनवाढीच्या महत्त्वाच्या बाबी

हरभरा पिकाच्या फांद्या फुटणे व घाटे भरणे या पाणी देण्याच्या महत्त्वाच्या अवस्था असून जास्तीचे पाणी उपलब्ध असेल तर ते पाणी फुलोऱ्याच्या काळात हरभरा पिकास द्यावे.

तुषार सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास हरभऱ्याची चांगली वाढ होते. मात्र फुलोऱ्याच्या काळात तुषारने पाणी देऊ नये कारण त्यामुळे काही प्रमाणात फुलोरा झडतो. तेवढ्या काळात प्रचलित पध्दतीने हरभरा पिकास पाणी द्यावे.

हरभरा पिकावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकील २० मि.ली. १० लिटर पाण्यातून फुलोरा ते घाटे भरण्याच्या काळात दोन वेळा फवारावे.

फुलोरा ते घाटे भरताना पोटॅशियम नायट्रेट (१३:०:४५) खताची प्रत्येकी १% (१० लिटर पाण्यात १०० ग्रॅम) अशा २ फवारण्या १५ दिवसाच्या अंतराने कराव्यात.

गहू पिकाच्या उत्पादनवाढीच्या महत्त्वाच्या बाबी

गव्हाच्या मुकुटमुळे फुटण्याची अवस्था, कांडी धरण्याची अवस्था, फुलोरा, दाणे चिकात असताना व दाणे भरण्याची अवस्था या पाणी देण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या संवेदनक्षम अवस्था आहेत.

त्यासाठी गहू पिकास २१ दिवसाच्या अंतराने जमिनीच्या प्रकारानुसार ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

गव्हावरील तांबेरा व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी ३० ग्रॅम मँकोझेब किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराइड प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

गहू पिकावर पेरणीनंतर ५५ व ७० दिवसांनी २ % (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम) १९:१९:१९ हे खत फवारल्याने गव्हाच्या दाण्यावर चकाकी येते तसेच दाण्यांच्या वजनात वाढ होते.







## आरोग्य संपदा आहार




# अस्थिक्षयाने त्रस्त आहात?

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**



अस्थिचा विचार करताना नुसत्या हाडांचा, कवट्यांचा पोकळ विचार करून चालत नाही. मानवी शरीरातील अस्थि या धातूबरोबर पुरेशी मज्जा असलीच पाहिजे याचे भान रुग्ण आणि वैद्यकीय सल्लागारांना ठेवावेच लागते. अस्थिक्षयाचा विचार करताना मोठ्या सांध्यातून, गुडघे, पाठीचे मणके, खांदा, मान यातून आवाज येतो का? याचा मागोवा घ्यावा. विशेषत: जिने उतरताना त्रास होत असेल, तसेच एवढ्या तेवढ्या कमी शब्दांमुळे रुग्णाला राग येत असेल, चिडचिड होत असेल तर अस्थिक्षय समजून पुरेशी काळजी आणि औषधे न कंटाळता घ्यावी.

लाक्षा, शृंगभस्म, आस्कंद, तूप अशी घटकद्रव्ये असणारी विविध औषध योजना तारतम्याने वापरावी. लाक्षादि, संधिवातारी, गोक्षुरादि, आभादि गुग्गुळ आणि चंद्रप्रभा प्र. ३ गोळ्या दोन वेळा पाण्याबरोबर घ्याव्यात. रात्री आस्कंदचूर्ण घ्यावे. अशा कृश व्यक्तीने शतावरी किंवा अश्वगंधाघृत; स्थूल व्यक्तीने महातिक्तघृत घ्यावे. ज्यांना सिद्धघृत सहजपणे मिळत नाही त्यांनी शतावरीचूर्णाची लापशी किंवा शतावरीकल्प घ्यावा. मानसिक ताणतणाव, काळजी, खूप बौद्धिककाम, रात्रपाळी आणि कुपोषण, अवेळी जेवण अशी करणे असल्यास सारस्वतारिष्ट, ब्राह्मीवटी, ब्रालीघृत, ब्राह्मीप्राश यांचा युक्तीने वापर करावा. मुंग्या येणे, पोटर्या दुखणे, चिडचिड होणे, चाल मंदावणे, हाताला कंप येणे अशा विविध लक्षणांनुरुप अनुक्रमे

१) मुंग्या येणे : लाक्षदिगुग्गुळ, चंद्रप्रभा

२) पोटर्या दुखणे : चंद्रप्रभा, शृंगभस्म

३) चिडचिड होणे : लघुसूतशेखर च्यवनप्राश सुवर्णमाक्षिकादिवटी

४) चाल मंदावणे : चंद्रप्रभा, शृंग, सुवर्णमाक्षिकादि, आस्कंद चूर्ण

५) हाताला कंप : लघु मालिनी वसंत, सुवर्णमाक्षिकादि, लाक्षदि, गोक्षुरादि, चंद्रप्रभा यांची योजना करावे. रात्री आस्कंचूर्ण आणि निद्राकरवटी घ्यावी.

अस्थिक्षयाचा त्रास असणार्या रुग्णांनी कटाक्षाने विविध व्यसने, उशिरा आणि अपुरा आहार, जागरण टाळावे. पोटात वायू धरू नये आणि सदा उल्हसित राहावे इतपत हलका व्यायाम करावा. माफक फिरणे असावे.

# माजी सैनिकांसाठी नोंदणीची अंतिम मुदत १ मार्च पर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती,** सर्व माजी सैनिक, विधवा आणि त्यांच्या अवलंबितांना महासैनिक पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. नोंदणीची अंतिम तारीख १ मार्च २०२५ असून, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. महासैनिक पोर्टल (mahasainik.maharashtra.gov.in) ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. या पोर्टलच्या माध्यमातून सैनिक कल्याण विभाग आणि केंद्रीय सैनिक बोर्डाच्या योजनांचा लाभ घेणे सोपे होणार आहे. तसेच, स्पर्श प्रणालीमधील निवृत्ती वेतनविषयक माहिती तत्परतेने सोडवण्यासाठी मदत होणार आहे , असे अमरावती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सेना मेडल (निवृत्त) मेजर आनंद पाथरकर यांनी सांगितले.नोंदणीसाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, डिस्चार्ज बुक, पी.पी.ओ., पेन्शन पासबुक, ई.सी.एच.एस. कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, मोबाईल क्रमांक, शैक्षणिक कागदपत्रे आवश्यक आहेत. नोंदणी शुल्क १०० रुपये असून ते ऑनलाईन पद्धतीने भरावे. अर्ज भरताना सर्व माहिती अचूक आणि स्पष्ट असणे आवश्यक आहे. कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात अपलोड करावी लागतील. नोंदणीनंतर अर्जाची प्रिंट काढून, मूळ कागदपत्रांसह पडताळणीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे भेट देणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे संपर्क साधावा.

# सरकारी शाळांची बदनामी टाळा

## अहवालावर प्राथमिक शिक्षक समिती आक्रमक




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती,**

६कॉर्पोरेट घराण्यांच्या दावणीला बांधल्या गेलेल्या आणि समाजाच्या मालकीच्या शाळा बंद करण्याच्या षड्यंत्रात सर्वप्रथम असलेल्या संस्थेचा शैक्षणिक गुणवत्तेबाबत २०२४ चा अहवाल नेहमीप्रमाणे सरकारी शाळांची बदनामी करणाराच आहे.

या संस्थांनी सरकारी शाळांची बदनामी टाळावी तसेच राज्यातील शिक्षकांनी या अहवालाची होळी करून निषेध नोंदवावा, असे आवाहन प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी केले आहे. सरकारी शाळा बंद झाल्या पाहिजे, असा असर होण्यासाठीच वर्षानुवर्षे हा अहवाल येत आहे.

एक होती आजी. एकदा तिला बहिणीचे पत्र आले. आजीला तिने आपल्या घरी पूजेला बोलावले होते. आजीने निघताना घराला कुलूप लावले ती प्रवासाला पायी निघाली. ही दुसऱ्या इयत्तेतील चार वाक्ये राज्यातील सहावी ते आठवीच्या ३० टक्के मुलांना वाचता येत नाही तसेच ४१-१३, ६४-४८, ३१-१३, ५३-२४ अशी वजाबाकीसुद्धा येत नाही. राज्यात तिसरीच्या ३७ टक्केच मुलांना दुसरीचे पुस्तक वाचता येते, अशा प्रकारची मुक्ताफळे या अहवालातून पुढे आली आहेत.

राज्यातील कोणत्याही प्राथमिक शाळेत प्रत्यक्ष दैनंदिन कामकाजाच्या वेळेत न जाता संबंधित संस्थेने शैक्षणिक गुणवत्तेचे सर्वेक्षण कधी आणि कसे केले, हा संशोधनाचाच नव्हे तर संबंधितांचा हेतू समजून घेण्याचा विषय आहे. राज्यातील एकाही सरकारी शाळेत असरदार अहवाल तयार करणाऱ्या संस्थेचे कुणीच कधीच जात नाही. मग शैक्षणिक गुणवत्तेची तपासणी कधी, कशी आणि कोण करतात, हे अद्यापही शिक्षकांच्याच नव्हे तर पालकांच्याही दृष्टीने न कळलेले वास्तव आहे.-

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


# लाडक्या बहिणींना ॲडव्हान्समध्ये पैसे देता पण कष्टकऱ्यांना देत नाहीत

## बच्चू कडूंचा प्रहार, ही योजना फक्त सत्तेपोसाठी आणली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती –** लाडकी बहिण योजना ही सत्तेपोसाठी आणलेली योजना असल्याचे वक्तव्य प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी केलं आहे. सोयाबीनचे, कापसाचे भाव पडले आहेत. लाडक्या बहिणींना ॲडव्हान्स पैसे देता आणि कष्ट करणाऱ्या लोकांना पैसे देत नाहीत, असे म्हणत कडू यांनी राज्य सरकारवर टीका केली. दिव्यांग नागरिकांना ६ महिने झाले पैसे भेटले नाहीत असे बच्चू कडू म्हणाले.

चझडउ च्या परीक्षांबाबत देखील बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली. याबाबात राजकारणी आणि प्रशासनातील लोकांना फार गांभीर्यानं नाही असे कडू म्हणाले. शहरात युवक अभ्यास करून नोकरीसाठी प्रयत्न करत असतात. तरी नोकरी मिळत नसेल तर काय बंदुक घ्यावी का हातात? असा सवाल कडू यांनी केलाय



चंद्रकांत पाटील आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर देखील बच्चू कडू यांना विचारण्यात आलं. यावेली ते म्हणाले की, राज्यापेक्षा केंद्र सरकार महत्वाचं आहे. केंद्रात अजित पवारांपेक्षा शरद पावर आणि उद्धव ठाकरे सक्षम आहेत असे कडू म्हणाले. बीड पालकमंत्री अजित पावर झालेत, याबाबत देखील विचारण्यात आले, यावेळी कडू म्हणाले की, रामाचे मंदिर बांधून देशावर उपकार केले पण त्याचं रामराज्य तयार झाल पहिजे. अनेक वाल्मिक कराड आहेत असेही कडू म्हणाले. कष्ट करणारे उपाशी मारतात हे दुर्दैवी असल्याचे कडू म्हणाले.

मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना कडू म्हणाले की, ही देशातील पहिली घटना आहे की, सत्तेतील माणूस राजीनामा मागतोय आणि सत्तेतील माणूस राजीनामा देत नाही असे कडू म्हणाले. काही लोक याचं राजकारण करत आहेत. कोणत्या गोष्टीचे राजकारण करावं कोणत्या नाही? याचा ताळमेळ राहिला नाही असेही कडू म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. वाल्मिक कराड हेच सुत्रधार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळं याप्रकरणाची कोणत्याही दबावाखाली चौकशी झाली नाही पाहिजे. यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा असी मागणी केली जात आहे. विरोधकांसह सत्ताधारी पक्षातील आमदारांनी देखील धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.

# दोन सावकारांच्या निवासस्थानी धाडी

## सहकार विभागाची कारवाई : आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती –** अवैधरीत्या सावकारी करणाऱ्या दोन सावकारांच्या निवासस्थानी सहकार विभागाच्या पथकाने धाडी घातल्या. या – धाडीत सावकारांकडून कोरे धनादेश, इसारचिठ्ठींसह आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त केली आहेत. त्यांच्याविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.



मुकुंद काशीराव पुसदकर (रा. प्लॉट क्र. २, विजयानंद अपार्टमेंट, सामरानगर) व प्रकाश काशीराव पुसदकर (रा. हरिओम कॉलनी, विठ्ठल मंदिराजवळ), असे सावकारांची नावे आहेत. या दोन्ही सावकारांविरुद्ध सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार नांच्याकडे तक्रारी होत्या. त्यावरून पनिबंधक स्वाती गुडधे यांच्या नेतृत्वात तैन पथकांची नियुक्ती करण्यात आली व घाडी घालण्यात आल्या. मुकुंद पुसदकर यांच्याकडून स्वाक्षरी असलेले कोरे स्टॅम्प पेपर, ईसारचिठ्ठी, स्थावर मालमत्ता खरेदी खत, उसनवार रक्कम दिल्याची पावती, असे एकूण १९ दस्तावेज जप्त करण्यात आले. ही कारवाई सकाळी १०.४५ ला प्रारंभ झाली व २.३० पर्यंत चालली.दुसरी धाड सहायक निबंधक आशिषचर्जन यांच्या नेतृत्वातील पथकाने दुपारी १.२५ ला प्रकाश काशीराव पुसदकर यांच्याकडे घातली. या धाडीत दोन खरेदी खत जप्त करण्यात आले. ही कारवाई अझहर खान, संध्या बदरिया, नंदकिशोर जवंजाळ यांनी पार पाडली. यावेळी पंच म्हणून अश्विनी शेंडे, रोशन सांभारे तर कोकिळा राऊत उपस्थित होत्या.

# वाळूतस्करांचा युवकावर हल्ला, दर्यापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१दर्यापूर–** शहरात वाळू चोरट्यांचा धुमाकूळ सुरू आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांतून वाळूने भरलेले ट्रॅक्टर घेऊन भरधाव वेगाने नेणे नित्याचे झाले असून अनेक ग्रामस्थ तथा शेतकरी हैराण झाले आहेत. त्यातच वाळू तस्करांनी एका युवकावर हल्ला केल्याची घटना येथे घडली.

यासंबंधात वाळूतस्करांना प्रशासनाचे असल्याचा आरोप होत आहे.

वाळूतस्कर आता गब्बर झाले असून साधे हटकले तरी त्यांची टोळी मारहाणीवर उतारू होत आहे. असाच प्रकार गुरुवारी (ता. ३०) दर्यापुरातील बुटी चौक येथे घडला.

येथील प्रशांत राजेंद्रसिंह ठाकूर (वय २२, रा. राजपूतपुरा, दर्यापूर) यांच्यावर वाळू चोरट्यांनी जीवघेणा हल्ला केला. यामध्ये ते गंभीर जखमीझाले असून त्यांना अमरावती येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

प्रशांत ठाकूर हे शिवसेना गटाचे पदाधिकारी असून ते आज सकाळी आपल्या शेतात जात असता शेताच्या धुऱ्यावरून वाळूने भरलेला ट्रॅक्टर भरधाव जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यावरून त्यांनी ट्रॅक्टर चालकाला हटकले असता वाळू ट्रॅक्टरमध्ये असणाऱ्या लोकांनी त्यांच्याशी हुज्जत घातली, यासह त्यांना गंभीर मारहाणसुद्धा केली.

यात प्रशांत ठाकूर हे गंभीर जखमी झाले असून त्यांनी दर्यापूर पोलिसांत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालक व कर्मचारी यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. दर्यापूर पोलिसांनी याबाबत तक्रार दाखल करून संशयित आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# गैरप्रकार आढळल्यास परीक्षा केंद्राची मान्यता होणार रद्द

## राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निर्णय





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि३१अमरावती,**

७बारावी च दहावीच्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आल्यास त्या परीक्षा केंद्राची मान्यता पुढील वर्षापासून कायमची रद्द करण्यात येणार आहे, असा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे.

इयत्ता बारावीची परीक्षा ११ ते १८ फेब्रुवारी तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या काळात होईल. सर्वच परीक्षा केंद्रांवर केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्रांवर समाविष्ट असणाऱ्या शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य शाळा, उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांमधून करण्याची कार्यवाहीची माहिती संबंधितांना माध्यमिक शिक्षण मंडळाने आधीच दिली होती. त्यासंदर्भात लोकप्रतिनिधी, विविध शिक्षण संघटना व संस्थाचालक संघटना यांनी हरकती घेतलेल्या आहेत. त्यामुळे या निर्णयात अंशतः बदल करण्यात येत असून फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बारावी व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (दहावी) परीक्षा निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी बोडनि भूमिका स्पष्ट केली आहे. कोविड काळातील २०१९ ते २०२१ या दोन परीक्षा वगळून मागील पाच वर्षांच्या म्हणजेच मार्च २०१८, २०१९, २०२०, २०२३ व २०२४ या परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून आलेली आहेत, अशा परीक्षा केंद्रांवर केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींचीनियुक्ती सदर केंद्रावर समाविष्ट असणाऱ्या शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर अन्य शाळा उच्च



माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वे कर्मचार्याधन नियपत करण्यात येणार आहे. २०२५ फेब्रुवारी–मार्च मधील दहावी आणि बारावी परीक्षांमध्ये गैरमार्गाची प्रकरणे आढळून येतील, त्या परीक्षा केंद्राची मान्यता पुढील वर्षीपासून कायमची रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. जिल्हाधिकारी व जिल्हा दक्षता समिती अध्यक्ष यांना त्यांच्या जिल्ह्यात दहावी व बारावीची परीक्षा पारदर्शक होण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे नियोजन करण्याची मुभा राहील. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सदस्य सचिव दक्षता समिती, विभागोय मंडळे यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा दक्षता समिती अध्यक्ष यांच्या सहकायनि परीक्षा कालावधीत प्रत्येक परीक्षा केंद्रावर पूर्णवेळ बैठे पथक कार्यरत राहणार आहे.

# राष्ट्र समर्था ‘देवी अहिल्या की पुण्यगाथा’ महानाट्य 3 फेब्रुवारी रोजी

## अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनप्रवास उलगडला जाणार

### विश्व मांगल्य सभेची माहिती , सांस्कृति भवन येथे भव्य स्वरुपात आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती –** पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी जन्मोत्सवानिमित्त विश्वमांगल्य सभेच्या वतीने, पहिल्यांदाच अमरावतीमध्ये राष्ट्र समर्थ देवी अहिल्या की पुण्यगाथा या ऐतिहासिक नाटकाचे आयोजन होतं आहे. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे हा कार्यक्रम होतं आहे. अमरावतीकर नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन विश्व मांगल्य सभेतर्फे बुधवारी (ता.२९) पत्रपरिषदेत करण्यात आले.अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे पिठाधिश्वर पं.पू.जितेंद्रनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वमांगल्य सभा ही महिलांची एक राष्ट्रीय संघटना आहे. भारतीय संस्कृतीचा आत्मा आपली कुटुंब व्यवस्था आहे. या कुटुंबाचा मुख्य आधार आणि केंद्रबिंदू प्रत्येक घराची आई आहे. विश्व मांगल्य सभेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सशक्त, सुसंस्कृत, कुटुंबाभिमुख, हुशार महिला आणि माता निर्माण करणे ज्यांना राष्ट्र आणि धर्मावर गाढ श्रद्धा आहे. अशाच एका तेजस्वी स्त्री, राष्ट्र समर्थ देवी अहिल्याबाई यांचा इतिहास पुन्हा एकदा अनुभवण्यासाठी, विश्वमांगल्य सभा अमरावती शाखेतर्फे एक भव्य महानाट्य अर्थात राष्ट्र समर्था ’देवी अहिल्या की पुण्यगाथा’ हा विशेष कार्यक्रम ३ फेब्रुवारी २०२५ रोजी अमरावतीच्या सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या महानाट्यामध्ये नागपूर–मुंबई येथील ४५ पेक्षा अधिक कलाकारांचा समावेश असून त्यामाध्यमातून अहिल्यादेवी होळकर यांचा संपूर्ण जीवनप्रवास प्रेक्षकांसमोर उपलगडला जाणार असल्याचेही विश्व मांगल्य सभेतर्फे सांगण्यात आले. बनारस येथील नमो घाटावरून या महानाट्याची सुरूवात झाली असून आगामी काळात देशाच्या विविध भागात ५१ ठिकाणी या महानाट्याचे आयोजन होणार आहे.



आतापर्यंत १० पेक्षा अधिक ठिकाणी या नाट्याचे प्रयोग पुर्ण झाले आहेत. अमरावतीकरां साठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा संपूर्ण जीवनप्रवास याची देही याची डोळा अनुभवन्याची ही सुवर्ण संधी असून नागरिकांनी या महानाट्याच्या कार्यक्रमाकरिता उपस्थित रहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. पत्रपरिषदेला डॉ.वसुधा अनिल बोंडे, विदर्भ प्रांत संघटन मंत्री तेजसा जोशी, विदर्भ प्रांत उपाध्यक्ष रश्मि मोहन जाजोदिया, विश्व मांगल्य सभा अमरावतीच्या अध्यक्ष श्वेता पांडे, रश्मी इटकिकर, राष्ट्रीय बालसभा संयोजिका अंजली देव, सविता गुढे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# घुईखेड येथे श्रीसंत बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळ्याला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१घुईखेड , चांदुर रेल्वे** संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीसंत बेंडोजी महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याला प्रारंभ झाला आहे. हा महोत्सव नऊ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.इ. स. १३३७ पासून बेंडोजी महाराजांचा संजीवन समाधी सोहळा सुरू आहे. या सोहळ्याचे यंदा ६८८ वे वर्ष असून आता सोहळ्याला भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. अशातच गुरुवारपासून (ता. ३०) या सोहळ्याला उत्साहात सुरवात झाली आहे. पाच फेब्रुवारीला काल्याचे कीर्तन, शोभायात्रा, दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर



यात्रा महोत्सव नऊ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.गुरुवारी श्रीसंत बेंडोजी



महाराज मंदिरात तीर्थ स्थापना, कलश स्थापना, अभिषेक, लघुरुद्राभिषेक संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर व पत्नी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर दिनकरराव घुईखेडकर व शशिकांत चौधरी सहपत्नी तसेच प्रा. शैलजा ढोमणे व प्रभाकर ढोमणे (अमरावती) यांच्या हस्ते देवी भागवत कथा व कलश स्थापना झाली. तर विश्वस्त प्रवीण घुईखेडकर व पत्नी यांच्या हस्ते होमपूजा करण्यात आली. यानंतर या सोहळ्यातील संगीतमय देवी भागवत कथेला प्रवक्ता संगीताताई करंजीकर यांच्या वाणीतून सुरवात करण्यात आली. कथेची पूजा हिंमतराव नाचणे व पत्नी यांच्याहस्ते करण्यात आली. या कथेच्या सप्ताहादरम्यान दररोज सकाळ व दुपारी भागवत कथा होणार आहे.याशिवाय दररोज सामुदायिक प्रार्थना, काकड़ा आरती, ग्रामसफाई व गावातून फेरी काढण्यात येत आहे. तर सकाळी आठ वाजता आरती, श्री बेंडोजीबाबा महाराज ग्रंथाचे पारायण वाचन निवृत्तीनाथ गोळे करीत आहेतः यावेळी नंदकिशोर काकडे, संजय काकडेगजानन फिस्के, बंडू बनकर, डॉ. वानखडे, संगम तायडे, अभय घुईखेडकर, अमोल देशमुख, विवेक घुईखेडकर, प्रथमेश गिरी, दादाराव क्षीरसागर प्रशांत काकडे, प्रशांत घुईखेडकर, प्रमोद ढवळे, अनिल शेंडे यासह अनेक भाविक भक्तांची उपस्थिती होती. महाप्रसाद वाढण्यासाठी गावातील ४० महिलांनी सेवा दिली.

# सुट्या पैशांवरून बाचाबाची

## एसटी बसच्या वाहकाला मारहाण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१नागपूर –** एसटी बसमध्ये प्रवासादरम्यान सुटे पैसेबाबत झालेल्या वादातून बसच्या वाहकाला मारहाण झाल्याची धक्कादायक माहिती आहे. ही घटना अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर आगारातील नांदेड बुद्रुक या मार्गावर घडली. एसटीच्या नव्या भाडेवाढीमुळे प्रवाशी व वाहक यांच्यात झालेल्या सुट्या पैशांवरून दररोज बाचाबाची होत असून अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर आगारातील नांदेड बुद्रुक या मार्गावर कामगिरी बजावणाऱ्या वाहकाला मारहाण झाल्याचा गुन्हा पोलिसात दाखल करण्यात आला आहे.

भाडेवाढ झाल्यानंतर पाच दिवसात अनेक ठिकाणी बाचाबाची झाल्याच्या घटना सोशल मीडियावर फिरत असून यातून पुढे काही अनर्थ घडू नये यासाठी खबरदारी म्हणून भाडेवाढ सूत्रात तात्काळ बदल होण्यासाठी एसटीकडून पुन्हा एकदा राज्य परिवहन प्राधिकरणाकडे फेरप्रस्ताव सादर करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे.

नवीन भाडेवाढ ही पाच रुपयांच्या पटीत असावी असा स्पष्ट प्रस्ताव एसटीने या पूर्वीच पाठवला असताना त्याला प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली व आर्थिक नुकसान होण्याचे कारण देत अनपेक्षितपणे बदल करून एक रुपयाच्या पटीत भाडेवाढ करण्याचा आदेश काढला असून सध्या चलनात सुट्या पैशाचे व्यवहार जवळ जवळ बंद झाले आहेत.

भाडेवाढीवर निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणाला आहे. १६ जून २०१८ रोजी व २६ ऑक्टोंबर २०२१ रोजी जी भाडेवाढ करण्यात आली आहे. ती पाचच्या पटीत करण्यात आली असून त्याच सूत्रानुसार भाडेवाढ पाचच्या पटीत करण्यासाठी प्राधिकरणातील अधिकाऱ्यांना सांगायला हवे.सुट्या पैशाची अडचण येत असल्याचे पुरावे देऊन त्याच प्रमाणे वाहकांकडून आलेल्या तक्रारी व पोलिसात दाखल झालेले गुन्हे याचे पुरावे सादर करून पुन्हा एकदा प्रस्ताव एसटीकडून पाठवला जावा असेही बरगे यांनी म्हटले आहे.

# पात्र बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र द्या अन्यथा आंदोलन

## सरपंच संघटना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१शिरजगांव मो.** ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक संघटने कडून ९० दिवस काम केल्या बाबतचे प्रमाणपत्र न देण्याची भूमिकेवर ठाम असल्यामुळे ग्रामीण भागातील पात्र लाभार्थी सुद्धा दाखला मिळत नसल्याने बांधकाम कामगारां साठी शासनाच्या कल्याणकारी योजने पासून वंचित राहात आहे.

विशेष म्हणजे ही योजना विद्यार्थी शिष्यवृत्ती / बाळनपण अर्थसाहाय्य / कुटुंबाला संसारीक साहित्य / विवाहा करिता आर्थिक साहाय्य / आरोग्य विषयक अशा विविध महत्वपूर्ण बाबींशी समंधित असून दाखला मिळत नसल्याने शासनाच्या अनेक प्रभावी लोकोपयोगी योजना ठप्प झाल्या आहे व या पासून लोकं वंचित राहत आहे ग्रामीण भागातील लोकांना किती दिवस योजने पासून वंचित ठेवणार असा सवाल सरपंच संघटने कडून करण्यात आला_याबाबत गेल्या काही महिन्या पासून सातत्याने पाठपुरावा सुरु आहे काही दिवसा पूर्वी ❋गटविकास अधिकारी कामगार संघटना सरपंच संघटना ग्रासेवक संघटना❋ यांनी संयुक्त चर्चा करून गटविकास अधिकारी यांनी यावर तोडगा काढला होता मात्र ग्राम सेवक युनियन ने पुन्हा दाखले देण्यास नकार दिल्यामुळे पारिस्थिती जैसे थे आहे अशात गावातील लोकं सरपंच यांचे कडे समंधित योजना आम्हाला का मिळत नाही या बाबत विचारणा करतात पात्र आणि गरजू लाभार्थी वंचित राहत असल्यामुळे गावात रोष निर्माण होत आहे.गटविकास अधिकारी यांनी यावर तोडगा काढून लोकांना न्याय देण्यासाठी वरील विशय तात्काळ मार्गी लावावा अन्यथा सरपंच संघटना कामगार संघटना, वंचित लाभार्थी यांचे सह आंदोलन करण्यात येईल अशी भूमिका घेत सरपंच संघटना तिवसा च्या वतीने निवेदन देण्यात आले.

# माझ्याकडे टिप्पर सोडा साधे टायर पण नाही: आमदार सुरेश धसांचे आरोप फेटाळले

## पोलिस अधिकाऱ्याची ऑडिओ क्लिप व्हायरल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१बीड–** भाजप आमदार सुरेश धस यांनी पत्रकार परिषद घेत बीड जिल्ह्यातील विशेषतः परळी तालुक्यात सुरू असलेल्या अवैध व्यवहारांवर भाष्य करत धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप लावले आहेत. यातच त्यांनी भास्कर केंद्रे या पोलिस काँस्टेबलचे देखील नाव घेतले होते. भास्कर केंद्रे यांच्या नावार १०० रखेचे टिप्पर असल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला आहे. यावर आता भास्कर केंद्रे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. हेड काँस्टेबल भास्कर केंद्रे यांची एक ऑडिओ कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली आहे. यात ते माझ्याकडे टिप्पर सोडा, साधा टायरही नाही. जर माझ्या कोणत्याही नातेवाईकाकडे, मित्राकडे किंवा इतर कोणाकडे टायर जरी असेल तर मी एका मिनिटात राजीनामा देईन. माझ्यावर कशामुळे हे आरोप होतात हे समजत नाही. तुम्ही कोणालाही माझ्या गावात पाठवा माझ्याबद्दल विचारा. आता मुलीचं लग्न झालं तेव्हा मी कर्ज घेतले होते, असे बोलताना दिसतात.एका वृत्तवाहिनीने त्यांच्या संपर्क केला तेव्हा भास्कर केंद्रे यांना याबाबत प्रश्न विचारण्यात आले, त्यावर बोलताना भास्कर केंद्रे म्हणाले, मी जे काही बोललोय ते खरे बोललो आहे. सुरेश धस यांनी स्वतःच सांगितले आहे की इथे येऊन चौकशी करा. आता मीही सांगतो की इथे येऊन चौकशी करा. जेसीबी आणि हायवा हे घेण्याइतपत माझी ऐपत नाही. माझ्याकडे काहीही असते तर मी गुपचूप बसलो असतो किंवा फोन बंद केला असता.पुढे बोलताना भास्कर केंद्रे म्हणाले, सुरेश धस हे राष्ट्रवादीत असताना आम्ही काही कारवाई केलेल्या होत्या. त्यामुळे पूर्ववैमन्यसातून ते हे बोलत असावेत. मी आता बाहेर आहे. यानंतर मी याबद्दल कायदेशीर पावले उचलणार आहे. माझ्या कुटुंबाचे, माझ्या मुलीचे फोटोही व्हायरल करण्यात आले. पोलिस खात्यात काम करत असताना माझा रेकॉर्ड तुम्ही पाहा. पोलेस महासंचालकांनी माझा सन्मान केला आहे, असेही भास्कर केंद्रे यांनी म्हंटले

# हेमंत नृत्य कला मंदिर प्रस्तुत स्वरानंद शास्त्रीय व उपशास्त्रीय सामूहिक सतार वादनाचा कार्यक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती –** अमरावती शहरातील गायन, वादन, नृत्य एकाच ठिकाणी शिकवल्या जाणारी सर्वात जुनी संस्था म्हणजे हेमंत नृत्य कला मंदिर. बोडे सरांचा क्लास माहिती नाही अशी व्यक्ती अमरावतीत क्वचितच सापडेल. स्व. नरसिंग बोडे, स्व. रमेश बोडे आणि श्री दत्तराज बोडे या तिघा बंधुनी १९६० मधे अमरावतीत गायन, वादन, आणि नृत्य यांचे वर्ग सुरु केले. सुरवातीला वनिता समाज येथे सुरु असणारे हे वर्ग आता मालटेकडी रोड वरील हेमंत नृत्य कला मंदिर च्या स्वतः च्या जागेत सुरु आहेत. पहिल्या पिढीने अतिशय कष्टाने लावलेल्या या इवल्यशा रोपाचे आता अनेक शाखा असलेल्या वृक्षात रूपांतर झाले आहे. त्याचीच एक शाखा म्हणजे या संस्थेचे विदर्भातील एकमेव असलेले बॅचलर ऑफ परफॉरमिंग आर्टस् हे कॉलेज. या तिघांची पुढची पिढी देखील संगीताच्या क्षेत्रात कार्यरत आहे. येथे शास्त्रीय गायनासोबत कथक,ऑडीसी हे नृत्य प्रकार आणि तबला, गिटार, व्हायोलीन, सतार ही वाद्ये इथे शिकवली जातात. अमरावतीत सतार शिकवण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे हेमंत नृत्य कला मंदिर. स्व. बिमलेंदू मुखर्जी यांचे शिष्य आणि पं. बुधादित्य मुखर्जी, अनुपमा भागवत, अवनेंदू शिवलीकार यांचे गुरु बंधु असलेले प्रा. योगेश बोडे यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेत शिकणारे त्यांचे बारा विद्यार्थी आपल्या गुरूंसह शनिवार दि. १ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ वा. सांस्कृतिक भवन येथे स्वरानंद हा शास्त्रीय व उपशास्त्रीय सतार वादनाचा कार्यक्रम सादर करणार आहेत. वय वर्ष ६३ ते वय वर्ष २० या वयोगटातील विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत आणि त्यातही महिलांची संख्या जास्त आहे. सामूहिक सतार वादनाचा अमरावतीत होणारा हा पहिलाच कार्यक्रम.या कार्यक्रमात प्रा. योगेश बोडे यांच्यासह संध्या बिदरकर, प्रवीणा पारनाईक, वंदना खडतकर, उज्वला अरसड, स्मिता जोशी, उमा धर्मे , रोशनी दर्जी,नंदिनी पापळकर, मेघा देशमुख, विभुती रायबागकार, पूर्वी बोडे आणि अनिश कवडे सतार वादन करणार आहेत. प्रियंका सातपुते, सोनम होले, दामिनी राऊत, तनिषा आचलिया, सुजय सरदार आणि राजवीर कासट हे गायनाची साथ करणार आहेत. तबला संगत श्री महेंद्र बोडे व श्री संकेत जोशी करतील तर टाळ संगत हर्षित बोडे करतील आणि निवेदन करणार आहेत श्री नितीन भट. या कार्यक्रमाला अमरावती शहरातील संगीतप्रेमिंनीआणि सगळ्या जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अशी विनंती आयोजकां तर्फे करण्यात आली आहे.–

# राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना ४०६६ आधार किट मिळणार

## माहिती तंत्रज्ञान विभागाची माहिती , पुण्याला मिळणार सर्वाधिक किट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ मुंबई–** राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसाठी ४०६६ नव्या आधार किटचे वाटप करण्यात येणार आहे. येत्या १० फेब्रुवारी रोजी हे वाटप करण्यात येणार आहे. याची माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे. आशिष शेलार यांनी आज मंत्रालयात माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव पराग जैन नैनुटीया यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

नवीन आधार कार्ड काढणे, आधार कार्ड नूतनीकरण करणे, पत्ता बदलणे, अशा विविध सेवा देणारी ई सेंटर राज्यभर सुरू असून यासाठी लागणारी ३,८७३ आधार कार्ड किट सन २०१४ साली जिल्हाधिकारी कार्यालयाना उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यापैकी सुमारे २,५५८ किट सध्या वापरात असून १,३१५ किट नादुरुस्त झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २,५६७ नव्या किटची मागणी करण्यात आली होती. याबाबत ग्रामीण भागातून आलेल्या मागण्या लक्षात घेत आढावा बैठक घेण्यात आली आहे.

आता येत्या १० फेब्रुवारी रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात आधार किटचे वाटप केले जाणार आहे. सध्या युआयडीआय टेस्टिंगची प्रक्रिया सुरू आहे. पुणे जिल्ह्याला सर्वाधिक ३३८ किट देण्यात येणार आहेत, तर भंडारा जिल्ह्याला सर्वात कमी २३ किट देण्यात येणार आहेत. पुणेनंतर लातूरला सर्वाधिक २७१ किट देण्यात येणार आहेत. राजधानी मुंबई शहरात १०३ आधार किट देण्यात येणार आहेत.

### कोणत्या जिल्ह्याला किती आधार किट?

अहिल्यानगरला ३४ अकोला ७८, अमरावती १०९, छत्रपती संभाजीनगर १३४, बीड ५८, भंडारदरा २३, बुलढाणा १२४, चंद्रपूर ७४, धुळे ११३, गडचिरोली ४४, गोंदिया ४८, हिंगोली ८८, जळगाव १६७ ,जालना १०४, कोल्हापूर १८८, लातूर २७१, मुंबई शहर १०३, मुंबई उपनगर १२२, नागपूर ९१, नांदेड ११२, नंदुरबार ९०, नाशिक ४९, उस्मानाबाद ७३ आणि पालघर जिल्हाधिकाऱ्यांना १५३, परभणी ५५, पुणे ३३८, रायगड ६३, रत्नागिरी ५९, सांगली १३०, सातारा १३२, सिंधुदुर्ग १६०, सोलापूर १४६, ठाणे ४००, वर्धा ५०, वाशिम १००, यवतमाळ ८३ किट उपलब्ध होणार आहेत.

# हिंदू - मुस्लिम ऐक्याचा संदेश:बाबा कंबलपोष उरूस शाही संदलचा मान ठाणेदारालाच

## ९६ वर्षाची परंपरा आजही कायम; यवतमाळ जिल्ह्यातील सर्वांत मोठा उत्सव



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१यवतमाळ–** शहरातील अरुणावती नदीच्या तिरावर वसलेले हिंदू व मुस्लिम ऐकतेचे प्रतीक बाबा कंबलपोष यांच्या उरूस शरीफला येत्या ५ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. बाबा कंबलपोष यांच्या उर्सला यवतमाळ जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा म्हणून सुद्धा पाहिले जाते. विशेष म्हणजे, या उरूसा सुरुवात ही आर्णी पोलिस स्टेशन येथील ठाणेदारांच्या संदलने होते. या पाच दिवसीय उरूसाच्या उत्सवात जातीभेदाच्या भिंती भेदून सर्वच समूहाचे लोक याठिकाणी दाखल होतात.

१९२९ साली बाबा कंबलपोष यांचा स्वर्गवास झाला. बाबा कंबलपोष यांच्या स्वर्गवासानंतर त्यांचे जिवलग असलेले बच्चू बाबा यांनी १९३० साली (उर्दू वर्षानुसार) बाबा कंबलपोष यांच्या उरूसाला शाही संदल काढून सुरुवात केली अन् आर्णी शहराला उरूसाची परंपरा लाभली. मात्र, उर्दू वर्षानुसार उर्सची तारीख ही कधी हिवाळ्यात यायची, तर कधी पावसाळ्यात. त्यामुळे यात्रेकरूंसह यात्रेतील दुकानदारांना या उर्सच्या बदलत्या तारखेनुसार येणाऱ्या ऋतूचा सामना करावा लागत होता. त्यामुळे बच्चू बाबा यांच्या अध्यक्षतेखाली कमिटीची बैठक बोलावण्यात आली. या बैठकीमध्ये उर्स शरीफची तारीख ठरवण्यासाठी चर्चा झाली. त्यामध्ये इंग्रजी वर्षातील ५ फेब्रुवारी उर्स शरीफची तारीख पक्की झाली. आता उर्सची तारीखही हवी ती पक्की झाली होती, उरला तो उरूसाच्या शाही संदलची जबाबदारी एखाद्याकडे द्यायचा प्रश्न हा विचार बच्चू बाबा यांच्या मनात आला. ही जबाबदारी कोणत्याही राजकीय व्यक्तीकडे न देण्याचे ठरले. त्यावेळी आर्णी हे एक छोटेसे गाव होते, आर्णी येथे फक्त पोलिस स्टेशन अस्तित्वात होते. या पोलिस स्टेशन ला करामत अली नावाचे दरोगा कार्यरत होते. अंदाजे १९४० साली बाबा कंबलपोष यांच्या उर्सच्या शाही संदलची जबाबदारी आर्णी पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेले दरोगा करामत अली यांच्याकडे देण्यात आली. १९४० साली उर्सचा पहिला शाही संदल (पोलिस अधिकाऱ्यांकडून) करामत अली या पोलिस अधिकाऱ्याच्या बंगल्यावरून काढण्यात आला. तेव्हापासून ही परंपरा आजही कायम ठेवण्यात आली आहे.

सर्वधर्म समभावाचे बीज पेरल्या गेले बाबा कंबलपोष यांचे पूर्ण नाव शमशुल आरेफीन शीराजूल सालेकीन हजरत सैय्यदना अश्शाह अलहाज अब्दुल रहेमान साहब कीबला कादरी ऊर्फ हजरत बाबा कंबलपोष र.अ. असे आहे. याला लागूनच बच्चु बाबा यांचे समाधी स्थळ आहे. पुर्वेस बाकीपूरी महाराज यांचा मठ व काही अंतरावच महादेव मंदिर आहे.

# महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केली ऑक्सिजन पार्क परिसर, शिवाजी महाविद्यालय परिसर, विलास नगर परिसरात स्वच्छतेच्या कामाची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती–** महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी शुक्रवारी सकाळी शहरातील ऑक्सिजन पार्क परिसर, शिवाजी महाविद्यालय परिसर, विलास नगर परिसरातील स्वच्छतेच्या कामाची पाहणी केली. अमरावती महानगरपालिकेच्या 'स्वच्छ भारत मिशन'ची महानगरपालिका क्षेत्रात अंमलबजावणी होत आहे. सार्वजनिक स्वच्छतेवर महानगरपालिकेने भर दिला आहे. या स्वच्छता अभियानाची महानगरपालिका क्षेत्रात योग्यरीतीने अंमलबजावणी होतेय की नाही, सदर ठिकाणी स्वच्छतेचे काम खरोखर चांगले होतेय का हे पाहण्यासाठी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी नुकतीच पाहणी केली. या मिशनअंतर्गत महानगरपालिकेकडून योग्य पद्धतीने स्वच्छतेचे कामे होणे गरजेचे आहे. या शहरातील विविध परिसराची महानगरपालिका आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी सुरू आहे. स्वच्छतेच्या कामाचा आढावा घेत त्यांनी हजेरी बुकांची तपासणी केली. स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार व घंटागाडी कर्मचाऱ्यांशी चर्चा करत स्वच्छता करतांना रस्त्याचे साईड पट्टी स्वच्छता करण्यात यावी अशी सक्त सूचना त्यांनी केली. कचरा परिसर स्वच्छ करुन त्वरित तो कचरा घंटागाडीत टाकण्याबाबत निर्देश दिले. मार्केट परिसरात स्वच्छतेप्रमाणेच प्रत्येक विक्रेत्यांकडे कच-यासाठी डबा असलाच पाहिजे तसेच कोणाकडेही प्लास्टिक पिशवी असताच कामा नयेत, असा कडक इशारा आयुक्तांनी दिला. हयगय नकोच, अन्यथा कारवाई साफ सफाईच्या कामात कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही, अशी तंबी यावेळी त्यांनी दिली. संपुर्ण परिसर, नाले साफ झाले पाहिजेत, रोड साईडला गवत दिसायला नको, दुभाजक स्वच्छ असावेत. जे हातगाडीवाले कचरा टाकतात त्या हातगाडयांवर कार्यवाहीचे निर्देश त्यांनी दिले. त्यानुसार, स्वच्छतेबद्दलची परिस्थिती सुधारण्यासाठी महानगरपालिका वेगवेगळी पावले उचलत आहे. सदर परिसरातील स्वच्छतेची पाहणी आयुक्तांनी संपूर्ण परिसरात फिरून केली. सदर परिसरातील स्वच्छतेबाबत अधिक दक्ष राहून परिसर स्वच्छतेची कार्यवाही करावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी दुकानदारांना ओला व सुका कच-यासाठी डस्टबिन ठेवण्याबाबत सक्त निर्देश आयुक्तांनी दिले. यावेळी सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार उपस्थित होते.

# वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी चरणी नममस्तक.....







अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी रुजू झाल्यानंतर आज प्रथम मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे आज अमरावती दौऱ्यावर आले असता त्यांनी सर्वप्रथम गुरुकुंज मोझरी येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजयांच्या समाधी चे दर्शन घेत आपल्या दौऱ्याची सुरुवात केली यावेळी गुरुदेव सेवा मंडळाचे संचालक जनार्धनजी बोथे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत केले.यावेळी तिवसा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे, प्रविण पोटे, सह अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.तसेच समाधीस्थळाचा विकास ही जबाबदारी आपली असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

## सावधान रात्री उशिरा फटाके फोडाल तर...

### सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

सार्वजनिक ठिकाणावर गोंगाट करणे, उशिराने रात्री-रात्री फटाके फोडणे, शिवाय जे वाजवणे असे प्रकार रणे तुम्हाला अडचणीत आणू शकते.



पोलिसांच्या रात्र गस्तीदरम्यान किंवा कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी असे प्रकार करताना कोणी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध थेट गुन्हे दाखल केले जाऊ शकतात. वर्षभरात अशा काही कारवाई जिल्ह्यात झाल्या आहेत.

सण, उत्सवांच्या कालावधीत दिल्या जाणाऱ्या वेळेच्या मर्यादेचे पालन ज्याप्रमाणे करणे अपेक्षित असते, त्याच पद्धतीने वर्षभरसुद्धा दररोज रात्री उशिरा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा आजूबाजूला नागरिकांना त्रास होईल, अशा पद्धतीचे वर्तन करणे हे चुकीचे असते.यात सायलेन्स झोन परिसर, कार्यालय, शासकीय शासकीय रुग्णालय किंवा खासगी दवाखाने, मंदिर, रहिवासी क्षेत्र अशा सर्व ठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे पालन करणे गरजेचे असते. त्यासाठी नगरपालिका, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, पोलिस अशा सर्वांनी आवाजाच्या मर्यादेसोबतच विविध निबंध निश्चित केले आहेत.

**गोंगाट करत असेल तर करा पोलिस विभागाकडे तक्रार**

रहिवासी क्षेत्र असो की बाजारपेठ किंवा शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालय आणि रुग्णालय अशा परिसरात कोणी गोंगाट करत असेल तर त्याबाबत संबंधितांनी पोलिस ठाणे. जिल्हा पोलिस नियंत्रण कक्ष डायल ११२ येथे संपर्क साधावा. अशा प्रकरणातील तक्रारीवर त्वरित कारवाई केली जाते.

## संभाव्य पाणीटंचाईसाठी आढावा : रवी राणा यांचा पुढाकार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

आमदार रवी राणा यांनी गुरुवारी अमरावती व भातकुली तालुक्यातील पाणीटंचाईचा आढावा घेतला. यात नागरिकांच्या समस्या, गाऱ्हाणी जाणून घेताना पाणीपुरवठ्याशी संबंधित बाबीवर आ. राणांनी फोकस केले. पाणीटंचाई उद्भवणार नाही, याविषयी दक्षता घेण्याविषयी सूचना केल्या.

तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीला आ. रवी राणा, जिल्हाधिकारी सौरभकटियार, सीईओ संजीता महापात्र, उपविभागीय अधिकारी पी. मिनू, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अनिल एसडीओ भटकर, तहसीलदार विजय लोखंडे भातकुलीचे तहसीलदार येडे गटविकास अधिकारी तुपे, दांडगे मजीप्रा कार्यकारी अभियंता सोळंके, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. जाधव, सालफडे, सोमवंशी, मजीप्रा उपकार्यकारी अभियंता लोखंडे, आजने यासह विविध विषय यंत्रणा विभाग प्रमुख, विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.याप्रसंगी ९८५ कोटींच्या अमरावती शहराला पाणीपुरवठा योजनेचे सादरीकरण झाले, तसेच विश्रोळी १०५ गावे अन् १५८ कोटी, शहानूर १५६ गावे आणि १८५ कोटींच्या योजनेचे सादरीकरण करण्यात आले. महादेव खोरी परिसरात नवीन शुद्धीकरण केंद्र होणार असून १५ नवीन जलकुंभनिर्माण होणार आहे. अमरावती व बडनेरा शहराच्या नवीवस्तीमध्ये जलवाहिनी टाकण्यात येईल.आमदार रवी राणा यांनी यंत्रणेला पाणीटंचाई गावांमध्ये विहीर अधिग्रहण, हातपंप, विहीर खोलीकरण करण्याचे आदेश दिले.सुनील राणा, आ. राणा यांचे सचिव उमेश ढोणे, मंगेश झंझोले, अशिष कावरे, गिरीश कासट, विनोद जायलवाल, रश्मी घुले, मिनल डकरे उपस्थित होते.

## जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवात कलाविष्कारांची रंगतदार अद्वितीय मेजवानी

### सांस्कृतिक महोत्सव ठरला जिल्ह्याचे कला वैभव अधिक प्रगल्भ करणारा लोकोत्सव : कराओके, समुहगीत, भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, अभिनय, हास्यजत्रा व नृत्याने वेधले लक्ष : सिईओ संजीता मोहपात्र यांच्या गीताला प्रेक्षकांची दाद : रविवारला पारितोषिक वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी विभागीय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवात कराओके, समुहगीत, भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, अभिनय, हास्यजत्रा व आदिवासी नृत्याने धमाल उडविली. विविध कलाविष्काराला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र यांच्या सुमधुर गीताने प्रेक्षकांची वाहवा मिळविली. जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी विभागीय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सव येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या पटांगणात सुरू आहे. दरम्यान येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात गुरुवारी (ता.३०) सांस्कृतीक कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कराओके गीत, समुह नृत्य, भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, अभिनय, हास्य जत्रा असे बहारदार कार्यक्रम सादर केले. यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने अधिकारी व कर्मचारी यांनी कलेचा आविष्कार सादर केला. तसेच समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले. दरम्यान या महोत्सवाचा बक्षीस वितरण सोहळा रविवारला (ता.२) होणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा क्रीडा सचिव बालासाहेब बायस, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी अश्विनी मारणे,लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, कृषिविकास अधिकारी मलप्पा तोडकर, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने यांनी सहभाग नोंदवून कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढविला. दरम्यान, अंजनगाव सुर्जी, मोर्शी, अधिकारी वर्ग, चांदुर रेल्वे, दर्यापूर, चिखलदरा, धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, तिवसा, भातकुली,धारणी,अचलपूर, मुख्यालय, अमरावती, चांदुर बाजार, वरुड या पंचायत समितीमधील अधिकारी कर्मचारी यांनीकराओके, समुहगीत, भक्तीगीत,भावगीत, लोकगीत, सिनेगीत, अभिनय, हास्यजत्रा व नृत्य सादर करून कलाविष्कारांची रंगतदार मेजवानी दिली. संचालन शेख शकील,सुरेश चिमणकर, दिपीका भारती यांनी केले. अशी माहिती क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे, सहसंयोजक पंकज गुल्हाने यांनी दिली. असे क्रिडा महोत्सव प्रसिध्दी समितीचे विनायक लकडे, शकील अहमद, राजेश सावरकर, श्रीनाथ वानखडे यांनी कळविले आहे.




### सी.ई.ओ.संजिता मोहपात्र याच्या गीताने वेधले लक्ष

जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र यांनी या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात मधुर आवाजात गीत सादर केले. उपस्थितांनी या गीताला उस्फुर्त जोरदार दाद दिली.

अधिकाऱ्यांचा कार्यक्रमात सक्रिय सहभागया महोत्सवात बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, अचलपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधीर अरबट, तिवसा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी तथा क्रीडा संयोजक नितीन उंडे, वित्त विभागातील लेखाधिकारी मधुसूदन ईचक्के, संजय नेवारे यांच्यासह आदी अधिकाऱ्यांनी आपली कला सादर करून कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

**प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करून समाजाचे वेधले लक्ष**

या महोत्सवात प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करून समाजाचे लक्ष वेधून संदेश देण्यात आला.नांदगाव खंडेश्वर पंचायत समितीच्या 'नारी शक्ती अवतार काली' या समूह नृत्याने सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. धामणगाव पंचायत समितीचे ' नारी उठा तलवार ', चिखलदरा पंचायत समितीचे समूह नृत्य, अंजनगाव सुर्जी आदिवासी नृत्य, चांदुर बाजारच्या 'सत्यम शिवम सुंदरम' कराओके गीत, अचलपूर पंचायत समितीचे शेतकरी व सैनिकांना समर्पित समूह नृत्यासह विविध नृत्याला उपस्थितांनी दाद दिली.

## तब्बल २४ दिवस थांबवलेली सोयाबीन खरेदी सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापूसतळणी येथील सुमित्राई फार्मर प्रोड्युसर कंपनीमार्फत सुरू असलेल्या शासकीय खरेदी केंद्रावर २ जानेवारीपासून ट्रॅक्टर ट्रॉलीत असलेले सोयाबीन अखेर तब्बल २४ दिवसांनंतर म्हणजेच २५ जानेवारीला ट्रॅक्टर भाड्यासह संपूर्णपणे मोजून घेतले. या मागणीसाठी प्रहार जनशक्ती संघटनेचे अंजनगाव सुर्जी उपतालुकाप्रमुख अरुण शेवाणे यांनी आंदोलन केले होते.

शेतकरी जयदीप रामेश्वर गिरनाळे (रा. कापूसतळणी रत्नापूर) या शेतकऱ्याने सुमित्राई फार्मर प्रोड्यूसर कंपनी येथील शासकीय सोयाबीन केंद्रावर २ जानेवारी रोजी सोयाबीन नेले असता, ग्रेडरने खरेदीला नकार देऊन ट्रॅक्टर बाजूला घेण्यास शेतकऱ्याला भाग पाडले. सोयाबीन एफएक्यू दर्जाचे असल्यामुळे शेतकऱ्याने कंपनीला फोनवर माहिती दिली असता, कंपनी प्रमुखांनी पाच-सहा दिवस वेळ मारून नेला. त्यामुळे त्रस्त होऊन शेतकऱ्याने ६ जानेवारी रोजी आत्मदहनाचा इशारा दिला.यानंतर अरुण शेवाणे यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थायांच्याकडे निवेदन देऊन सोयाबीन पेटवून आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला होता. त्यामुळे नाफेड केंद्रचालकाने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून आंदोलनाच्या एक दिवस आधीच शेतकऱ्याचे संपूर्ण ५३ बॅग सोयाबीन खरेदी केली आहे. त्याच बरोबर २४ दिवसांपासून उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीचे भाडे देखील शेतकऱ्याला दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्याने समाधान व्यक्त केले.

## 'नंददीप'च्या सेवाकार्यास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कायम सहकार्य

### कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांची ग्वाही : बेघर मनोरूग्ण केंद्रास भेट देत जाणून घेतले कार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१यवतमाळ**

यवतमाळ येथील नंददीप फाऊंडेशन बेघर मनोरूग्णांसाठी करत असलेले सेवाकार्य अलौकीक आहे. संत गाडगेबाबांच्या सेवेचा वसा नंददीपचे संदीप व नंदिनी शिंदे दाम्पत्य चालवित आहे. त्यांच्या सेवाकार्यास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कायमच सहकार्य राहील, अशी ग्वाही विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी दिली.

स्थानिक नंददीप फाऊंडेशनद्वारे संचालित बेघर, मनोरूग्ण निवारा केंद्रास कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी आज गुरूवारी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी नंददीपचे कार्य कसे चालते, ते समजून घेतले. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी उपस्थित होते. कुलगुरूंनी निवारा केंद्राची पाहणी करून अनेक मनोरूग्णांशी संवाद साधला. यावेळी येथील रूग्ण सीमा हिने कुलगुरूंशी इंग्रजीत संवाद साधून आपल्याला पुढे शिकायचे असल्याचे सांगितले. तर वाल्मिक नावाच्या अभियांत्रिकी पदवी घेतलेल्या युवकाने अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनीय काम करायचे असल्याचे सांगितले.

यावेळी संस्थेचे संपूर्ण रेकॉर्ड कसे हाताळले जाते, याची माहिती सेवानिवृत्त मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांनी दिली. येथे रूग्णांवर होत असलेल्या संगीत उपचार पद्धतीचा सकारात्मक फायदा होत असल्याचे त्यांनी कुलगुरूंना सांगितले. निवारा केंद्रात असलेल्या व आतापर्यंत दाखल होवून परत गेलेल्या ७०० वर रूग्णांचे संपूर्ण रेकॉर्ड संस्थेने दिवसनिहाय जतन करून ठेवल्याचे बघून, कुलगुरू डॉ. बारहाते यांनी या कामाचे कौतुक केले. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी संदीप व नंदिनी शिंदे यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. तर संस्थेच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देवून सत्कार करण्यात आला.



यावेळी पत्रकार नितीन पखाले यांनी 'डेबू ते गाडगेबाबा' हे पुस्तक कुलगुरू व मान्यवरांना भेट दिले. निवारा केंद्रात नियमितपणे मदतीसाठी येवून मनोरूग्णांची काळजी घेणाऱ्या लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींचा कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. संत गाडगेबाबा समाजकार्य पुरस्कार सोहळ्यात नंददीपला एक लाख रूपयांची मदत जाहीर करणाऱ्या ऑस्ट्रेलियातील पौर्णिमा गडलिंगे (कुळकर्णी) यांनी ही मदत संस्थेस दिल्याने नंददीपच्या वतीने त्यांचे विशेष आभार यावेळी मानण्यात आले. विद्यापीठाच्या कार्यक्रमामुळे नंददीपला थेट विदेशातून मदत मिळाल्याचे यावेळी अनंत कौलगीकर यांनी सांगितले. कार्यक्रमास प्रा. घनश्याम दरणे, डॉ. निखीलेश नलोडे, नितीन पखाले, भगवान भितकर, प्रा. संतोष गोरे, प्रा. ममता दयने, प्रा. कविता तातेड, प्रा. शैलेंद्र तेलंग आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन निशांत सायरे यांनी केले. कार्यक्रमास सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# प्रविण पोटे पाटील यांनी केला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुकुटाने गौरव

## भाजप अमरावतीच्या वतीने पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांचे जंगी स्वागत











**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असताना माननीय चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दैदिप्यमान यश संपादन केले. त्यानंतर पालकमंत्री झाल्यानंतर अमरावतीतील त्यांच्या प्रथम आगमनानिमित्त, तसेच त्यांच्या कार्याचा गौरव व सन्मान करण्यासाठी भाजप अमरावती शहर अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी पितळी मुकुट चढवत भव्य सत्कार केला.पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या कुशल नेतृत्वामुळे महाराष्ट्रात भाजपाने नेत्रदीपक यश मिळवले असून, आगामी निवडणुकांमध्येही भाजपाचाच विजय होईल, असे ठाम मत भाजप शहर अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केले.यावेळी भाजप अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने, पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या प्रथम आगमनानिमित्त, प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात भव्य स्वागत सोहळा पार पडला. फटाक्यांची आतीषबाजी, फुलांची उधळण करत पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे जंगी स्वागत करण्यात आले.यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीतया जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून माझी नेमणूक झाल्यानंतर अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांची त्यांच्या मालमत्तेची काळजी घेणे जीवाची काळजी घेणे तुमचं रसखान करणे सोबतच राज्य आणि केंद्र सरकाच्या योजना लाभार्थ्या पर्यंत पोहचवणे या सर्व बाबींची मी काळजी घेणार असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. नागपूरच्या धर्तीवर अमरावती शहराचा विकास तसेच सर्व योजना आपण या ठिकाणी राबविणार आहोत त्यामुळे काळजी करण्याचे काहीही कारण नाही कोणी कार्यकर्ता माझ्या जवळून वापस जाणार नाही आपण आता सत्तेत आहोत त्यामुळे आपल्या जवाबदाऱ्या अधिक वाढल्या आहेत. तुम्ही आणि मी दोघे मिळून अमरावती शहर अधिक सुंदर बनविण्याचा प्रयत्न करू तसेच अमरावती शहरात मी महिन्यातून चार वेळा येणार असल्याचे हि त्यांनी यावेळी सांगितले.भाजप सदस्य मोहीमेत सहभागी व्हा व अधिकाधिक भाजप सदस्य कसे होतील या कडे लक्ष देण्याचे सांगितले.या सोहळ्याला आ. राजेश वानखडे, आ. चंदूभाऊ यावलकर, शिवरायजी कुळकर्णी, जयंतजी डेहनकर, दिनेशजी सूर्यवंशी, रविंद्रजी खांडेकर, एड. प्रशांत देशपांडे, रविराज देशमुख,चेतन पवार, सतिश करेसिया, विवेक कलोती, अनिताताई राज, कौशिक अग्रवाल ,गंगाताई खारकर, सुरेखताई लुंगारे यांसह प्रदेश पदाधिकारी, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, मोर्चा अध्यक्ष, प्रकोष्ठ व आघाडी संयोजक तसेच हजारो भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंबादेवी एकवीरा देवीचे दर्शन.......



पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आज अंबादेवी आणि एकवीरा देवीचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर संस्थांनच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. यावेळी श्री. वैद्य यांनी श्री. बावनकुळे यांचा हनुमानाची मूर्ती देऊन सत्कार केला. श्री बावनकुळे यांनी क्रीडापटूंची माहिती घेऊन कौतुक केले.

## गंगा सावित्री निवासस्थानी ना.चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या आगमनापित्यर्थ भव्य दिव्य सत्कार समारंभाचे आयोजन

### चंद्रशेखर बावनकुळे,आ.रवि राणा यांची बंदद्वार १ तास चर्चा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अमरावती जिल्हयाचे नवनिर्वाचित पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री .ना..चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी प्रथमच अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान आ.रवि राणा व मा.खा.नवनितजी राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी सदिच्छा भेट दिली यावेळी स्वत: मा.खा.नवनित रवि राणा तसेच युवा स्वाभिमान पार्टी महिला आघाडी व भाजपा महिला आघाडी यांनी औक्षवन करुन स्वागत केले. तसेच मंचावर सुद्धा आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांनी जिल्ह्यातील नवनिर्वाचीत आ.प्रविण तायडे, आ.केवलराम काळे, आ.राजेश वानखडे, आ.उमेश यावलकर यांच्यासह भव्य हाराने स्वागत केले.

यावेळी मंचावरुन बोलतांना आ.रवि राणा यांनी सांगितले की, बावनकुळे साहेबांसारखे पालकमंत्री मिळणे हे अमरावती जिल्हा वासीयांचे सौभाग्य असून नवनित राणा यांनी खासदारकीच्या कालावधीत आणलेल्या विविध प्रकल्पांच्या विकासासाठी चालना मिळणार असल्याचे यावेळी स्पष्ट केले तसेच पालकमंत्री यांनी सुद्धा संबोधित करतांना सांगितले की नागपूर आणि अमरावतीचे नाते परिवारातील आपुलकीचे नाते असून मला सुद्धा अमरावतीचा पालकमंत्री झाल्याबद्दल आनंद होत आहे त्यामुळे आ.रवि राणा, मा.खा.नवनित राणा तसेच जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांनी अमरावती जिल्ह्याचा विकासाचा मला आराखडा द्यावा मी निश्चितच अमरावती जिल्ह्याचा विकासाकरिता जास्तीत जास्त निधी शासनाकडून देण्याचे वचन यावेळी दिले. याप्रसंगी विविध समाजातील समाज बांधवांनी सुद्धा पालकमंत्री बावनकुळे यांचा समाजाच्या वतीने सत्कार केला. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे,आ.रवि राणा यांची बंदद्वार १ तास गुप्त चर्चा ही झाली.

यावेळी मंचावर माजी आ.जगदीश गुप्ता, माजी शिक्षक आ.श्रीकांत देशपांडे, माजी आ.रमेशजी बुंदिले, तसेच बी-बियाणे महामंडळाचे अध्यक्ष प्रमोदजी कोरडे, समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया, पक्षनेता सुनिल काळे, भाजपा महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य डॉ.नितीन धांडे, जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, विनोद जायलवाल, कमल किशोर मालानी, साई राजेशजी मोरडिया, ड.सागर महाराज देशमुख, अरुण पडोळे, सुनिल राणा, किरण पातुरकर, माजी महापौर किरण महल्ले, ललीत समदुलकर, रविराज देशमुख, रविंद्र खांडेकर, प्रणय कुलकर्णी, सचिन रासने, ड.प्रशांत देशपांडे, दिपक खटाळे, संजय हिंगासपुरे, नितीन बोरेकर, उमेश ढोणे, नाना आमले, किरण वसंत अंबाडकर, विनोद गुहे, सचिन भेंडे, सुमती ढोके, अर्चना तालन, चंदा लांडे, राधा कुरील, अजय जयस्वाल, संजय तिरथकर, पवन हिंगणे, सिमेश श्राफ, सतीश मंत्री, उमेश डकरे, किशोर पिवाल, संजय माहुलकर, भुषण पाटणे, सुखदेव तरडेजा, जितु मोटवानी, राहुल बजाज, गणेशदास गायकवाड, गजानन शिंदे, महेश किल्लेकर, संजय मुनोत, दिनेश टेकाम, शेखर अवघड, प्रदिप अलोने, मिलींद अवघड, मिलींद कहाळे, आशिष गावंडे, श्याम हिंगासपुरे, मंगेश खोंडे, सुरेंद्र पोफडी, सुधिर रसे, बंडु डकरे, मंगेश इंगोले, गजानन रेवाळकर, सिद्धार्थ बनसोड, विलास वाडेकर, दिनेश सेठिया, कमलेश कारिया, लक्ष्मणराव लाठेकर, मधुकरराव देऊळकर, हरीश चरपे सोबतच भाजपा, युवा स्वाभिमान पार्टीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगरला ब्राह्मण उद्योजकांची आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषद २ फेब्रुवारीला

## उद्यम कौस्तुभ आणि जीवन गौरव या पुरस्काराची होणार घोषणा : डॉ.विक्रांत भालेव मिलिंद व मोहिनी केळकर यांचा होणार पुरस्काराने सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१छ. संभाजी नगर**

ब्राह्मण समाजाची देशातील सर्वात मोठी सामाजिक संस्था ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल बी बी एन जी तर्फे ९वी आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषद परिवर्तन २ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी एम जी एम संस्थेच्या रुख्मिणी सभागृह छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आली आहे. व्यवसाय, ज्ञान वृद्धी आणि नेटवर्किंग साठी ही परिषद ओळखली जाते. या परिषदेच्या निमित्ताने देश विदेशातील अनेक नामवंत वक्ते व शेकडो व्यवसायिक छ. संभाजी नगरलायेत असल्याचीमाहिती संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली.

समर्थ ब्राह्मण! समृध्द ब्राह्मण !! संपन्न ब्राह्मण !!! या ब्रीदवाक्यनुसार चालणाऱ्या बीबीएनजी च्या या वर्षीच्या परिषदे दरम्यान उद्यम कौस्तुभ आणि जीवन गौरव या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे . या मध्ये छत्रपती संभाजी नगर येथील लाइफलाईन मेडिकल डीव्हायसेस प्रा लि.चे डॉ.विक्रांत भाले यांना उद्यम कौस्तुभ तर ग्राइंड मास्टर प्रा लि चे मिलिंद व मोहिनी केळकर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या शिवाय अन्य पुरस्कार्थी पुढील प्रमाणे - डी एस ए इलेक्ट्रेक्ट्रेल्स प्रा लि मुंबईच्या आरती सुभेदार,ढेपे वाडा पुण्याचे नितीन ढेपे, सिम्प्लेक्स टेक्स्टाईल मिल्स भिवंडीचे अरविंद पहुरकर ,रेनमाक इंडिया प्रा लि मुंबई चे निलेश दीक्षित, युएइ येथील आरोग्य क्षेत्रात कार्यरत डॉ.संजय पैठणकर ,टायमस कंपनी नाशिकचे सुमित तिवारी, शुभम सेल्स -सोलर, पुण्याच्या ज्योत्स्ना गोडबोले यांना उद्यम कौस्तुभ तर अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती संस्था मुंबईचे प्रभाकर कुलकर्णी हे जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी आहेत.

परिषदेचे उद्घाटक म्हणून बेलराइज इंडस्ट्रीज लिमिटेड च्या सह-संस्थापक व कार्यकारी निर्देशक सुप्रिया बडवे व किशोर पंप्स चे व्यवस्थापकीय संचालक किशोर देसाई यांची प्रमुख उपस्थिती राहील .विख्यात अभिनेते मकरंद अनासपुरे हे देखील या परिषदेसाठी आवर्जून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते ब्राह्मण समाजातील यशस्वी उद्योजकांना पुरस्कार देण्यात येणार आहे. यासोबत डॉ. विजय जोशी (सिडनी, ऑस्ट्रेलिया), आनंद गानु (गर्जे मराठी यूएसए), अशोक बिल्डकॉन चे सी इ ओ संजय लोंढे , रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर चे विवेक देशपांडे , एस एम ऑटो स्टॅम्पिंग चे संचालकमुकुंद कुलकर्णी , मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी चे महासंचालक मुनीश शर्मा ,सीसीई फिनलंड येथील धोरण आणि विकास विभागाचे संचालक हेरंब कुलकर्णी,मुंबई एजुकेशन ट्रस्ट-भुजबळ नॉलेज सिटी नाशिकच्या शेफाली निधोजकर - भुजबळ ,ॲनालायझर चे सुशील कुलकर्णी,एम एस एम ई बोर्ड सदस्य प्रदिप पेशकार ,अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी ,परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅ. आशिष दामले,एनएचपीसी चे संचालक डॉ.उदय निरगुडकर ,बूम ९१ चे संस्थापक ओंकार दाभाडकर ,क्लिक स्किल्स एज्यु.प्रा लि चे प्रथमेश सखदेव ,सीढ्शन बिल्डर प्रो प्रा लि चे श्रीपाद देशमुख , अरविंद कोरालकर, सुयोग नरवणे , महेश देशपांडे , डॉ .अजय शेष असे नामवंत उद्योजक उपस्थित राहणार आहेत.

परिषदेला अधिकाधिक ब्राह्मण उद्योजकांनी उपस्थित रहावे असे आवाहन बी बी एन जी चे सहयोगी संचालक डॉ.अभिजित चांदे, परिषदेचे कप्तान शैलेश देशपांडे , उपकप्तान गीता आचार्य आणि संयोजन समिती तर्फे करण्यात आले आहे .अधिक माहितीसाठी www.bbngparivartan.com या वेब साईट ला भेट द्यावी.